# प्रेसनोट

दि.१३/०४/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | शिर्डी पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.२६२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | नितीन सगाजी मेहेरखांब, वय–४२ वर्ष, ग्रामसेवक, वर्ग–३, सजा पाथरे, ता.सिन्नर, जि.नाशिक रा.फ्लॅट नं.२, त्रिमुर्ती चौक, संगमनेर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे पाथरे खुा, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील गावठाण हददीत जुन्या घराचा काही भाग व ओटा तोडुन बांधलेल्या दोन मजली इमारतीची नोंद करुन व इमारतीची ग्रामपंचायत प्रमाणे घराची घरपटटी ठरवुन देण्याचे मोबदल्यात आरोपी लोकसेवक नितीन सगाजी मेहेरखांब, वय–४२ वर्ष, ग्रामसेवक, वर्ग–३, सजा पाथरे, ता.सिन्नर, जि.नाशिक यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/–रुपये लाचेची मागणी करुन, २५,०००/– रुपये लागलीच व उर्वरीत २५,०००/– रुपये नंतर स्विकारण्याचे मान्य करुन दि.१२/०४/२०२३ रोजी १८.०८ वा. चे सुमारास सार्थक बार ॲण्ड रेस्टॉरंट, जवळके, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर येथे २५,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक नितीन सगाजी मेहेरखांब याचेविरुध्द शिर्डी पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.२६२/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.१३/०४/२०२३ रोजी ०६.१७ वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर